

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील एक दूरदर्शी नेतृत्व, तंत्रज्ञान प्रसारक, समाजभिमुख विचारवंत आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व म्हणून डॉ दीपक शिकारपूर  यांचे नाव राष्ट्रीय स्तरावर अत्यंत आदराने घेतले जाते. सातत्यपूर्ण गुणवत्ता, अभ्यासू वृत्ती आणि नव्या तंत्रज्ञानाचा ध्यास यामुळे त्यांनी केवळ स्वतःचे करिअर घडवले नाही, तर हजारो युवकांना डिजिटल युगाची दिशा दाखवली आहे.

शालेय व महाविद्यालयीन शिक्षणात नेहमीच गुणवत्तेच्या शिखरावर राहिलेल्या डॉ. शिकारपूर यांनी अभियांत्रिकी पदवी, व्यवस्थापन विषयातील पदव्युत्तर शिक्षण तसेच आयटी व्यवस्थापनातील पीएच.डी. पूर्ण करून आपल्या ज्ञानाचा भक्कम पाया निर्माण केला. त्यांनी आपल्या व्यावसायिक कारकिर्दीची सुरुवात टाटा  उद्योसमूहामध्ये केली. सुमारे सोळा वर्षे विविध महत्त्वाच्या पदांवर कार्य करताना त्यांनी तंत्रज्ञान, व्यवस्थापन आणि नेतृत्व यांचा सखोल अनुभव मिळवला. मात्र नोकरीत समाधान न मानता त्यांनी तंत्र उद्योजकतेचा मार्ग स्वीकारला आणि नव्या पिढीसाठी प्रेरणादायी उदाहरण निर्माण केले.

सध्या ते कायनेटिक कम्युनिकेशन  व बेलराइज  या उद्योगसमूहांचे संचालक म्हणून कार्यरत आहेत. उद्योग, तंत्रज्ञान आणि व्यवस्थापन क्षेत्रातील त्यांच्या व्यापक अनुभवामुळे त्यांची २०२६-२८ या कालावधीसाठी मराठा चेंबर इंडस्ट्रीस अँड ऍग्रीकल्चर (एमसीसीआयए)  च्या नियामक मंडळावर निवड झाली आहे. आपल्या व्यावसायिक कामकाजाच्या निमित्ताने त्यांनी जगातील ४० हून अधिक देशांना भेटी देत जागतिक तंत्रज्ञान प्रवाहाचा अभ्यास केला आहे. त्यांच्या कार्याचा गौरव अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी झाला आहे. कॉसमॉस पुरस्कार, वीर सावरकर पुरस्कार, गो.रा. परांजपे पुरस्कार, रेन्लर परांजपे गौरव, शंतनुराव किर्लोस्कर गौरव, सिलिकॉन व्हॅली आयटी आयकॉन, सांगली भूषण, पर्वती पुण्यभूषण आणि पुणे फेस्टिव्हल २०२४ पुरस्कार यांसारख्या अनेक मानाच्या पुरस्कारांनी त्यांना सन्मानित करण्यात आले आहे. महाराष्ट्र राज्याच्या हीरक महोत्सवी सांगता समारंभात तत्कालीन राज्यपाल भगतसिंग कोश्यारी  यांच्या हस्ते “महाराष्ट्राची गिरिशिखरे” या विशेष पुरस्काराने २८ डिसेंबर २०२१ रोजी त्यांचा गौरव करण्यात आला.

कॉम्प्युटर सोसायटी ऑफ इंडिया  या  संगणक संस्थेचे ते माजी अध्यक्ष व मानद सदस्य (Fellow) आहेत. तसेच रोटरी इंटरनेशनल  च्या ३१३१ प्रांताचे २०१३-१४ साठी प्रांतपाल म्हणून त्यांनी अत्यंत यशस्वी कारकीर्द गाजवली. त्यांच्या नेतृत्वाखाली अनेक विक्रम प्रस्थापित झाले आणि रोटरीच्या जागतिक अध्यक्षांच्या हस्ते विशेष मानपत्र देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

तंत्रज्ञान क्षेत्रातील यशाबरोबरच समाजासाठी काहीतरी देण्याची त्यांची तळमळ विशेष उल्लेखनीय आहे.  वृत्तपत्रांमधील अभ्यासपूर्ण लेख, ६८ पुस्तके, प्रेरणादायी व्याख्याने आणि समुपदेशन यांच्या माध्यमातून ते युवकांना कौशल्यपूर्ण, आत्मविश्वासू आणि भविष्याभिमुख बनविण्याचे कार्य सातत्याने करत आहेत.

दृष्टिहीन विद्यार्थ्यांसाठी संगणक शिक्षण सुलभ व्हावे यासाठी त्यांच्या विविध पुस्तकांचे ब्रेल लिपीत रूपांतर करण्यात आले आहे. राज्यभरातील अनेक दृष्टिहीन विद्यार्थी या पुस्तकांचा लाभ घेत आहेत. या सामाजिक बांधिलकीची दखल घेत राष्ट्रीय दृष्टिहीन संघ (महाराष्ट्र) तर्फे २३ एप्रिल २०२४ रोजी जागतिक पुस्तक दिनानिमित्त त्यांचा विशेष सन्मान करण्यात आला. ग्रामीण आणि निमशहरी भागातील युवक डिजिटलदृष्ट्या सक्षम व्हावेत, रोजगारक्षम कौशल्ये आत्मसात करावीत आणि जागतिक स्पर्धेत आत्मविश्वासाने उभे राहावेत, यासाठी ते विविध उपक्रम राबवत असतात.

अधिक माहितीसाठी www.deepakshikarpur.com]

संपर्क : deepak@deepakshikarpur.com